**"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"**
**या बाबीची दरनिश्चिती बाबत.**

# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक.उसं/भांखस/फाईल पॅड व फाईल कव्हर्स/दरनिश्चिती/२०२२-२३/(१२)/२०२२** /डी-11842

**दिनांक:-** 18 NOV 2022

**वाचा :-१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.२९/०९/२०२२ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समिती मार्फत करण्यात येते. त्यानुसार **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीची **सन २०२२-२३** या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी **मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, औरंगाबाद** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दि.२९/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत **"फाईल पॅड व फाईल कव्हर्स"** या बाबीचे निश्चित केलेले दर खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

| **क्र.** | **वस्तूंचे नाव** | **विर्निदेश** | **दर प्रत्येकी (रुपये)** |
|---|---|---|---|
| १ | फाईल पॅड / (केस बोर्ड) | **Case Board** Size 24 cms, & 36 cms.<br>(to be manufactured from specification)<br>a) 91 DKG straw Board of 1887 GSM and size 61x86 cms. as per Grade A.<br>b) Strong while ape having a length of 98.5 cm and width of 1.25 cm. It should have a good selage. It should have a wrap of 2/20 and wett. of 2/10 with 48 ends 22 picks per 25.4 cm.<br>c) Superior binding cloth in the size 61 x 10 cm. It should be suitably strengthened by pecting catridge paper on the rough side. It should have 60 ends and 48 Picks per 2.54 mm. and should have a weight of 0.23 Kg. Per sq. Meter.<br>d) While catridge in the size 61 x 10 cms. 100 GSM.<br>e) Paper in the size 35.5 x 23.5 cms. 10 GSM | १५.०० |
| २ | फाईल कव्हर | **<u>File Covers as per (Specification)</u>**<br>24 BM Board duly printed with clothing (4"X14") inside and outside cloth duly punched leaving a distance of 3" between two punched holes these hiles should be in the entry of the Board.२४x ३६ सें.मी. (बाब क्र.२४ बीएम) २८० जीएसएम आणि किमान चिंधीचे प्रमाण ५० टक्के | **११.००** |

सदर दरनिश्चितीची **विधिग्राह्यता दि.३०.०४.२०२३** पर्यंत किंवा पुढील वर्षाचे दरनिश्चिती आदेश

निर्गमित होईपर्यंत यापैकी जी कार्यवाही नंतर होईल तो पर्यंत ग्राह्य राहतील. फाईल पॅड व फाईल कव्हर्स या बाबीसाठी जर वस्तू व सेवाकर (GST) लागू असेल, तर बाबीं करीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

अंध व अपंग यांच्या धर्मदाय संस्थांनी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, व बाजारातून वस्तू विकत घेऊन शासनास पुरवठा करु नये. तसेच सदर संस्थांनी संस्थेच्या अंध व अपंग सभासद व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०६ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडया मध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच कार्यादेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधी मध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखा पेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुर्ण न केलेल्या मालाची किंमत दोन लाखा पेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणाऱ्या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

सदर संस्थांनी शासकीय कार्यालयात फाईल पॅड व फाईल कव्हर्स यांचा केलेल्या पुररवठ्याबाबतचा अहवाल वस्तूनिहाय प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

सदरचे आदेश मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(वि.मु.सिरसाठ)
**उद्योग सह संचालक (भां.ख.)**

**प्रति,**

१) मे. प्रेरणा ट्रस्ट संचालीत अपंग कार्यशाळा, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद -४३१ ००१.

२) निवडनस्ती.